



दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com


**आजचा सुविचार**

काळा रंग हा अशुभ समजला जाती.
पण प्रत्येक काळा रंगाचा फळा
हा अनेक विद्यार्थांचे
आयुष्य उजलवत असतो...
– डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम


वर्ष : ०५ | अंक : ५४, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.०८ ऑक्टोबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


## जीएसटी ची फसवणूक करणाऱ्यास अटक

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०७, ठाणे :** महाराष्ट्र वस्तू व सेवाकर (जीएसटी) विभागाने विशेष मोहिमेअंतर्गत मे. ढोलकिया एन्टरप्राइजेस; जीएसटी क्रमांक २७अचइझ१५६३ऋ१नऋ या कंपनीचे प्रोप्राइटर इब्राइम असलम ढोलकिया यांना २४ सप्टेंबर २०२५ रोजी अटक केली असल्याचे माझगांव येथील राज्यकर उपआयुक्त (जनसंपर्क) जनार्दन आटपाडकर यांनी प्रसिद्धीपत्राद्वारे कळवले आहे.

मे. ढोलकिया एन्टरप्राइजेस या व्यावसायिकाविरोधात विभागातर्फे कारवाई सुरु करण्यात आली होती. कारवाई दरम्यान सदर व्यापाऱ्याने चुकीची कर वजावट व बनावट बिजके (इनव्हॉइस) जारी करून ११.८० कोटींची महसूल हानी केल्याचे निदर्शनास आले.

मा. अतिरिक्त मुख्य न्यायिक दंडाधिकारी, मुंबई यांनी आरोपी इब्राइम असलम ढोलकिया यांस ८ ऑक्टोबर २०२५ पर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

ही कारवाई अन्वेषण-ब चे राज्यकर सहआयुक्त संजय पवार व राज्यकर उपआयुक्त मंजिरी फणसळकर यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य कर सहायक आयुक्त उमेश ब. कांबळे, प्रशांत ना. बारवे, मनीषा क्षीरसागर व राज्य कर निरीक्षक, अन्वेषण-ब, मुंबई यांनी राबवली.

महाराष्ट्र वस्तू व सेवा कर विभाग सर्व समावेशक नेटवर्क विश्लेषण संसाधनांचा वापर करुन आणि इतर विभागांशी समन्वय साधून कर चुकविणाऱ्या व्यापाऱ्यांचा शोध घेत आहे. वित्तीय वर्ष २०२५-२६ मधील ही २९ वी अटक आहे.

## ५२८ ग्रॅम अंमली पदार्थासह ३५ लाखांचा मुद्देमाल जप्त आरोपीला अटक !




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०७, चंद्रपूर :** नागपूर-चंद्रपूर राष्ट्रीय महामार्गावरील साखरवाही फाट्याजवळील एचपी पेट्रोल पंपासमोर अमली पदार्थ विक्री करणाऱ्या एका आरोपीस स्थानिक गुन्हे शाखेने ५ ऑक्टोबरला अटक केली. त्यांच्याकडून तब्बल ५२८ ग्रॅम एमडी (मेफेड्रोन) ड्रग्जसह एकूण ३५ लाख ७ हजार ४८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. वसीम इमदाद खान (रा.बैगनवाडी, गोवंडी, मुंबई) असे अटकेतील आरोपीचे नाव असून, ही जिल्ह्यातील आत्तापर्यंतची सर्वात मोठी कारवाई आहे, अशी माहिती पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांनी सोमवार ६ ऑक्टोबर ला आयोजित पत्रपरिषदेत दिली.

आरोपी एमएच-१० ईक्यू ०४२१ क्रमांकाच्या चारचाकीमधून एमडी ड्रग्ज विक्रीसाठी मुंबईहून चंद्रपुरात येत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतले. तपासादरम्यान त्याच्याकडून २६ लाख ४० हजार रुपये किंमतीच्या ५२८ ग्रॅम एमडी ड्रग्जसह भ्रमणध्वनी, रोख रक्कम व चारचाकी वाहन असा एकूण ३५ लाख ७ हजार ४८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. आरोपीविरुध्द पडोली पोलीस ठाण्यात एनडीपीएस अधिनियम १९८५ अंतर्गत गुन्हा दाखल करुन अटक केली आहे.

२०२५ मध्ये एनडीपीएस अधिनियमांतर्गत चंद्कपूर जिल्ह्यात एकूण १५७ गुन्हे नोंदवून १९२ आरोपींवर कारवाई करण्यात आली. आरोपींकडून एकूण ८० लाख ५९ हजार ७७४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असल्याची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांनी दिली. गांजा विक्रीकरीता बाळगणारे आरोपींवर २६ गुन्हे नोंद करण्यात आली असून ५५.२४ किलो गांजा जप्त करुन ४० आरोपीवर कार्यवाही करुन ६,६२,१६४ /- रुपयाचा माल जप्त करण्यात आला. एम.डी. (मेफड्रोन) ड्रग्ज पावडर बाळगणारे आरोपीवर १४ गुन्हे नोंद करण्यात आले असून ७२२.६१४ ग्रॅम एम. डी. ड्रग्ज पावडर जप्त करुन ३१ आरोपींवर कार्यवाही करुन ४३,७८,०६०/- रु चा माल जप्त करण्यात आला. ब्राऊन शुगर पावडर बाळगणारे आरोपींवर १ गुन्हा नोंद करण्यात आला असून २९८ ग्रॅम ब्राऊन शुगर पावडर जप्त करुन ०२ आरोपींवर कार्यवाही करुन ३० लाख १९ हजार ५५० रु चा माल जप्त करण्यात आला. अंमली पदार्थ सेवन करणारे आरोपीवर १५६ गुन्हे नोंद करण्यात आले असून १८६ आरोपीवर कार्यवाही करण्यात आली असल्याचे पोलिस अधीक्षकांनी सांगितले.

# नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ३१ हजार ६२८ कोटींचे पॅकेज जाहीर

**▶६ हजार १७५ कोटी रूपये थेट मदत !**

नुकसानग्रस्त शेतकऱ्याला थेट मदत म्हणून ६५ लाख हेक्टरकरिता ६ हजार १७५ कोटी रूपये देण्याचा निर्णय राज्य सरकारने केला आहे. तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्याला आता रब्बीचे पीक घेता यावे म्हणून प्रती हेक्टरी अतिरिक्त

१० हजार रूपये देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासाठी ६५०० कोटी रूपये लागणार आहेत.

त्यानुसार कोरडवाहू शेतकऱ्याला १८ हजार ५०० हेक्टरी, हंगामी शेतकऱ्यांना २७ हजार रुपये हेक्टरी आणि जो बागायती शेतकरी आहे त्याना २२ हजार ५०० रुपये हेक्टरी मदत मिळणार आहे. ४५ लाख विमा उतरवलेल्या १७ हजार हेक्टरी पैसे शेतकऱ्यांना मिळणार आहे.

**लातूर, धाराशिव, नांदेड, बीड, हिंगोली आणि सोलापूर जिल्ह्यात १०० टक्के नुकसान...**



**अक्षराज : श्रीकांत जाधव**

**दि.०७, मुंबई :** यंदा खरीपाच्या मौसमात झालेल्या प्रचंड अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या शेत जमिनीचे, पिकांचे,जनावरांचे मोठं नुकसान झाले आहे. काही ठिकाणी जमीनही खरडून गेली आहे. त्यामुळे आता रब्बीचे पिके घेता येणार नाहीत. आर्थिक आणि मानसिक अशा दोन्ही प्रकारचा त्रास शेतकऱ्यांना आहे. मात्र आपला शेतकरी पुन्हा उभा राहिला पाहिजे, यासाठी

राज्य सरकार शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ३१ हजार ६२८ कोटीचे पॅकेज जाहीर करीत असल्याची घोषणा मुख्यमंत्री

देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या समवेत मंगळवारी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर मंत्रालयात संयुक्त पत्रकार परिषदेत ही घोषणा केली.

अतिवृष्टी झालेल्या परभणी, वाशिम, जालना, यवतमाळ जिल्ह्यात ५० टक्के नुकसान झाले आहे. तर छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर जिह्यात ७५ टक्के नुकसान आहे. आणि लातूर, धाराशिव, नांदेड, बीड, हिंगोली आणि सोलापूर जिल्हात ८० ते १०० टक्के नुकसान आहे. त्यामुळे या जिल्ह्यांना सर्वाधिक मदत मिळेल, असेही मुख्यमंत्री देंवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

चार खर्च कमी करावे लागेल तरी सरकार मागे पुढे पाहणार नाही. मात्र शेतकऱ्यांसाठी मदत कमी होऊ देणार नाही. अतिवृष्टीचा अधिक भार सहन करण्यासाठी येत्या हिवाळी अधिवेशनात कोणत्या योजनांना कपात करू याचा विचार केला जाईल असेही ते म्हणाले.

महाराष्ट्रात १ कोटी ४३ लाख ५२ हजार हेक्टरवर लागवड करण्यात आली होती. त्यापैकी ६५ लाख हेक्टरचे नुकसान झाले. राज्यातील २९ जिल्हे, २५३ तालुके आणि २ हजार ५९ मंडळ आहेत. तेथे नुकसान झाले आहे. त्यासाठी ३१,६२८ कोटी एवढे म्हणजे जवळपास ३२ हजार कोटींचे पॅकेज जाहीर केले आहे. ते आतापर्यंतचे सर्वाधिक मोठे शेतकरी मदत पॅकेज असल्याचा दावाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केला.

ज्या घरांचे नुकसास झाले त्यांना नव्याने घर बांधण्यासाठी मदत केली जाणार आहे. जेवढ्या जनावरांचा मृत्यू झाला असेल तेवढ्या जनावरांची मदत दिली जाणार आहे. दुधाळ जनावरांसाठी ३७ हजार ५००, कोंबड्यासाठी १०० रुपये,

बाधित विहिरीसाठी विशेष बाब म्हणून ३० हजार रूपये आणि खरडून गेलेल्या जमिनीसाठी ४७ हजार रुपये हेक्टरी आणि ३ लाख रुपये नरेगाच्या माध्यमातून दिले जाणार आहेत.

नुकसान झालेल्या जमिनीवर रब्बी पीक घेतले की नाही असा भेद केला जाणार नाही. सर्व शेतकऱ्यांना मदत दिली जाणार. कारखानदार शेतकऱ्यांना नफ्यातून पैसे द्यायचे आहेत. नदी, नाल्यावरील अतिक्रमण हटविण्यासाठी दीर्घकालीन उपाय योजना करण्याचे नियोजित आहे. सर्वाधिक बाधित जिल्हा सोलापूर आहे. तेथील नद्यामध्ये गाळ आहे. तो उपसून जमीन कशी उपजाऊ करता येईल हे पाहिले जाणार आहे. मत्स्यशेती आणि बोटीसाठी १०० कोटी राखून ठेवले जाणार आहेत.

# अल्पवयीन कातकरी मुलीचा ५० हजारात सौदा !!

**● दलाल आणि वधू पक्षावर गंभीर गुन्हे दाखल**

**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.०७, शहापूर (ठाणे) :** शहापूर तालुक्यातील खैरे गाव हद्दीतील शेणवा येथील आदिवासी कातकरी समाजातील अल्पवयीन मुलीचा जबरदस्तीने लग्न लावण्याचा कट श्रमजीवी संघटनेने उधळला असून किन्हवली पोलीस ठाण्यात गुन्हा र.नं २३८/२०२५ बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ चे कलम ९, १०,११ अन्वये दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणात पोलिसांनी तात्काळ कारवाई करत आरोपींवर गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तपासादरम्यान उघड झाले की, पिडीत अल्पवयीन मुलीचे वडील दत्तात्रेय विठ्ठल वातेस (वय ५०) यांनी आपल्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत बेताची असल्याने दलाल प्रकाश मुकणे यांच्या मध्यस्थीने मुलीचे लग्न जय लक्ष्मण शिर्के, रा.बाबुलवाडी, ता.पारनेर,जि. अहमदनगर याच्याशी ठरवले होते.

या व्यवहारात मुलीच्या बदल्यात पालकांना ५०,००० देण्याचे ठरवून त्यातील १०,००० रुपये रक्कम रोख स्वरूपात एक महिन्यापूर्वी देण्यात आली होती, असे तपासात निष्पन्न झाले आहे.

आरोपी जय लक्ष्मण शिर्के आणि त्याचे वडील लक्ष्मण रघुनाथ शिर्के हे उच्चवर्णीय समाजातील असून त्यांनी पिडीत मुलगी ही अल्पवयीन व अनुसूचित जमातीतील असल्याचे माहित असतानाही तिच्या कुटुंबाच्या गरीबीचा गैरफायदा घेत मुलीची विक्री करून विवाहाचा प्रयत्न केला.

५ ऑक्टोबर २०२५ रोजी लग्नाची तारीख निश्चित करण्यात आली होती, मात्र श्रमजीवी संघटनेच्या कार्यकर्त्यांना ही खबर मिळताच त्यांनी आदिवासी क्षेत्र आढावा समितीचे अध्यक्ष विवेक भाऊ पंडित यांना ही माहिती देतात त्यांनी दूरध्वनीवरून जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ व पोलीस अधीक्षक डॉ.डी. एस.स्वामी यांना माहिती दिली. पोलीस निरीक्षक नितीन खैरनार यांनी तात्काळ घटनास्थळी किन्हवली पोलिसांचे पथक रवाना केले. पोलिसांनी कारवाई करून अल्पवयीन मुलीचा सौदा करून लग्नाचा प्रयत्न करीत असलेला कट उधळण्यात आला. तपासादरम्यान आरोपींवर बालविवाह प्रतिबंधक कायद्यासह भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १४३(४), ३(५) आणि अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम १९८९ चे कलम ३(२) अशा गंभीर कलमांतर्गत किन्हवली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास उपविभागीय अधीक्षक मिलिंद शिंदे करीत आहेत.

या प्रकरणामुळे आदिवासी कातकरी समाजातील गरीब कुटुंबांना फसवून मुलींची खरेदी-विक्रीसारखी घृणास्पद पद्धत उघड झाली असून अशा प्रकरणांवर कठोर कारवाई करण्याची मागणी विवेक भाऊ पंडित यांनी शासनाकडे केली आहे.

आदिम आदिवासी अल्पवयीन मुलींच्या विक्री करून जबरदस्तीने लग्न लावण्याच्या या प्रथेविरुद्ध श्रमजीवी संघटनेने आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

# प्रसूतीसाठी आलेल्या महिलेल्याच्या मृत्यू प्रकरणाची चौकशी होऊन कारवाई होणार : आ. विलास तरे

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.०७, पालघर :** मनोर ग्रामीण रुग्णालयातील गंभीर निष्काळजीपणामुळे प्रिती जाधव (वय २२ वर्षे, धुकटण गाव) हिचा मृत्यू झाल्याबाबत तात्काळ चौकशी व जबाबदार डॉक्टर व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई अशी मागणी बोईसर विधानसभा आमदार विलास तरे यांनी सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांची प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन देत जोरदार मागणी केली आहे. दरम्यान जिल्हा प्रमुख वसंत चव्हाण उपस्थित होते.

यावेळी आमदार विलास तरे म्हणाले की, धुकटण (ता. जि. पालघर) येथील २२ वर्षीय प्रिती जाधव हिला प्रसूतीसाठी मनोर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. परंतु दुर्दैवाने, या रुग्णालयातील वैद्यकीय यंत्रणा, डॉक्टर व कर्मचाऱ्यांच्या अत्यंत गंभीर निष्काळजीपणामुळे तिचा मृत्यू झाला आहे. ही घटना केवळ वैयक्तिक नाही, तर ग्रामीण आरोग्य व्यवस्थेतील भ्रष्ट, निष्काळजी व असंवेदनशील कार्यपद्धतीचे अत्यंत भयानक उदाहरण आहे.

घटनेचा तपशील अशी की, प्रीती जाधव हिला प्रसूती दरम्यान स्थिती गंभीर झाल्याने मनोर ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टरांनी उपचाराऐवजी रुणाला लवकर दुसरीकडे घेऊन जा असे सांगून हात वर केले. रुग्णालयात १०८ ॲम्बुलन्स तत्काळ उपलब्ध करून देण्यात आली नाही. परिणामी, रुग्णाला वेळेवर उपचार मिळू शकले नाहीत. कर्तव्यावर असलेल्या डॉक्टर मनाली कोकाटे व डॉक्टर प्रशांत राजगुरू यांनी रुग्णाची गंभीर अवस्था पाहूनही जबाबदारी झटकत बाहेरच्या इस्पितळात हलविण्याचा सल्ला दिला, परंतु आवश्यक ती वैद्यकीय मदत व प्राथमिक उपचार न देता केवळ दुसरीकडे जा एवढ्यापुरतेच मर्यादित राहिले. गुजरात येथील इस्पितळाकडे रुग्णवाहिकेत जात असताना रस्त्यात ऑक्सिजन संपला. ऑक्सिजन सिलेंडर संपल्याने रुग्णवाहिका अर्ध्या रस्त्यातून परत आली आणि नवा सिलेंडर घेऊन पुन्हा मार्गस्थ झाली, परंतु तोपर्यंत उशीर झाला होता. रुग्णाचा अतिशय रक्तस्राव होऊन रस्त्यातच मृत्यू झाला आणि हे सर्व प्रशासनाच्या व डॉक्टरांच्या दुर्लक्षामुळे घडले. यापूर्वीही सप्टेंबर महिन्यात या रुग्णालयात सर्पदंश झालेल्या रुग्णाला वेळेवर उपचार न मिळाल्याने मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. म्हणजेच ही एक अकस्मात घटना नसून, सातत्याने चालत



असलेली निष्काळजीपणाची व जबाबदारी टाळण्याची प्रणाली आहे.

मनोर ग्रामीण रुग्णालय हे संपूर्ण पालघर जिल्ह्याच्या ग्रामीण भागासाठी आशेचे केंद्र असायला हवे होते; परंतु प्रत्यक्षात ते मृत्यूकेंद्र बनले आहे. येथे डॉक्टर व वैद्यकीय कर्मचारी हे केवळ हजेरी लावणारे कर्मचारी बनले आहेत. ना त्यांना रुग्णसेवेची भावना आहे, ना जबाबदारीची जाणीव. सार्वजनिक आरोग्य विभागाकडून दरवर्षी कोट्यवधी रुपये निधी मिळतो; तरीही रुग्णालयात प्राणवायूची सोय, आपत्कालीन ॲम्बुलन्स, रक्त उपलब्धता, प्रसूती सुविधा या सर्व गोष्टींचा पुरवठा खंडित स्थितीत आहे.ही परिस्थिती केवळ दुःखद नाही तर फौजदारी गुन्ह्याच्या चौकशीस पात्र आहे. कारण एका निरपराध तरुण मातेला तिच्या मूलाला जन्म देताना जिवंत ठेवण्यात राज्याच्या आरोग्य यंत्रणेला अपयश आले आहे.

त्याअनुषंगाने मागण्या करण्यात येत आहेत की, प्रिती जाधव यांच्या मृत्यूच्या प्रकरणाची अधिकृत उच्चस्तरीय चौकशी आदेशित करण्यात यावी. मनोर ग्रामीण रुग्णालयातील कर्तव्यावर असलेले डॉक्टर मनाली कोकाटे, डॉक्टर प्रशांत राजगुरू व संबंधित कर्मचारी यांना निलंबित करून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा. मनोर ग्रामीण रुग्णालयातील १०८ ॲम्बुलन्स सेवा व ऑक्सिजन पुरवठा प्रणालीची सखोल चौकशी करून दोषींवर तातडीने कारवाई करावी.

उक्त प्रकरणी मृत प्रीती जाधव यांच्या कुटुंबाला किमान २५ लाख रुपयांची आर्थिक मदत व एका नातेवाईकास शासकीय नोकरी देण्यात यावी. पालघर जिल्ह्यातील सर्व ग्रामीण रुग्णालयांच्या कार्यपद्धतीची विशेष तपासणी मोहीम तात्काळ राबवावी, जेणेकरून अशा घटना पुन्हा घडू नयेत. ही घटना केवळ एका रुग्णाच्या मृत्यूची नाही, तर संपूर्ण ग्रामीण आरोग्य यंत्रणेच्या अपयशाची साक्ष आहे, कडक शब्दात आमदार विलास तरे यांनी घटनेवर प्रतिक्रिया दिली आहे.

# संपादकीय

## भारतीय वायू दल !



आज ८ ऑक्टोबर, दरवर्षी ८ ऑक्टोबर हा दिवस भारतीय वायुसेना दिन म्हणून संपूर्ण देशात साजरा केला जातो. यावर्षी आपण आपला ९३ वा वायुसेना दिन साजरा करत आहोत. भारतीय वायू सेनेचे महत्व लोकांना कळावे आणि लोकांमध्ये जनजागृती व्हावी यासाठी हा दिवस साजरा केला जातो. भारतीय वायुसेना ही भारतीय संरक्षण दलांच्या पाच मुख्य विभागांपैकी एक असून तिच्यावर भारताच्या वायुक्षेत्राचे रक्षण करण्याची व भारतासाठी हवाई युद्ध करण्याची जबाबदारी आहे. भारतीय हवाई दल जगातल्या पहिल्या पाच उत्कृष्ट दलातील एक म ानले जाते. ८ ऑक्टोबर, १९३२ रोजी भारतीय वायुसेनेची स्थापना युनायटेड किंगडमच्या रॉयल एअरफोर्स ची सहाय्यक कंपनी म्हणून करण्यात आली. भारतीय वायुसेनेने पहिले स्काड्रन तयार केले आणि ८ ऑक्टोबरला ते मिशन पूर्ण केले. त्यानंतर वायुसेनेने अनेक पराक्रम केले. अल्पावधीतच भारतीय वायुसेना जगातील सर्वात शक्तिशाली वायुसेना बनली. तेव्हापासून ८ ऑक्टोबर हा दिवस भारतीय नौसेना दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी हवाई दलात योगदान देणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा सन्मान केला जातो. यादिवशी भारतीय वायू सेनेकडून परेड, एअर शो सादर केले जातात. मागील वर्षी उत्कृष्ट कामगिरी केलेल्या योद्ध्यांना या दिवशी पुरस्कार दिला जातो. त्यांचा यथायोग्य सन्मान केला जातो. सुब्रोतो मुखर्जी हे भारतीय वायू दलातील स्काड्रनचे पहिले प्रमुख होते. १२ मार्च १९४५ रोजी वायुदलाचे नाव रॉयल इंडियन एअर फोर्स झाले. सुरुवातीला भारतीय वायुदलाकडे खूप कमी विमाने आणि साधनसाम ग्री होती. १९४७ मध्ये विमानांना पिस्टनवर चालणारी इंजिने बसवलेली असत. जेट इंजिनांच्या आगमनानंतर त्याची जागा वेगवान जेट विमानांनी घेतली. प्रथम नॅट, हंटर, कॅनबेरा यासारखी ब्रिटिश बनावटीची विमाने वायुसेनेत सहभागी केली गेली. त्या नंतर तंत्रज्ञानाच्या कसोटीवर त्यांची जागा फ्रेंच बनावटीच्या विमानाने घेतली. भारतीय परराष्ट्र धोरणामुळे आणि रशियाने उत्तम सहकार्य केल्याने दणकट बनावटीची रशियन बनावटीची लढाऊ आणि मालवाहू विमाने सहभागी करण्यात आली. तसेच रशियन हेलिकॉप्टर्स सहभागी करण्यात आली. सद्य काळात आधुनिक रडार यंत्रणा, क्षेपणास्त्रे, दळणवळण यंत्रणा, नेटवर्क सेंट्रिक वॉरफेअर सी-४ आय ही संगणक प्रणाली वायुसेनेकडे आहेत. हवेतल्या हवेत इंधन पुरवठा करणारी विमाने, विमानातून रडार वापरून दूर अंतरावरील शत्रूच्या विमानांची टेहळणी करणारी यंत्रणा, कक्षेबाहेरील शत्रूच्या ठिकाणाचा वेध घेणारी इत्यादी अत्यंत आधुनिक शस्त्रास्त्रे सेनेत सहभागी करण्यात आली आहेत. आज भारतीय वायू दल जगातील सर्वात शक्तिशाली वायू दल समजले जाते. भारतीय वायू दल जातील चौथ्या क्रमांकाचे सामर्थ्यशाली वायू दल आहे. अमेरिका, रशिया आणि चीन पाठोपाठ भारताचेच वायू दल सर्वात मोठे वायू दल आहे. भारतीय वायू दलाची कामगिरी १४५ कोटी भारतीयांना अभिमान वाटावी अशी दैदिप्यमान आहे. ज्या ज्या वेळी देशाकडे शत्रूने वाकड्या नजरेने पाहिले त्या त्या वेळी भारतीय वायू दलाने उत्तुंग कामगिरी करून शत्रू राष्ट्राला दाती तृण धरायला लावले. १९४७/४८, १९६२, १९६५, १९७१, १९९९ साली झालेले कारगिल युद्ध किंवा नुकतीच झालेली ऑपरेशन सिन्दुर मोहीम या सर्व युद्धात भारतीय वायू दलाने महत्वाची भूमिका बजावली.

भारतीय वायू दल हा भारतीय संरक्षण दलाचा मानबिंदू आहे. भारतीय वायू दल दिनाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

# आनंदाचा शिधा हरपला...

## शिधा थांबवून सरकारने त्यांचा उद्याचा आत्मविश्वास कमी केला.




सरकारच्या हाती गरिबांच्या आयुष्यात 'आनंदाचा शिधा' नावाची छोटीशी, पण हृदयाला दिलासा देणारी मूठ होती. नावातच आपुलकी होती. जणू तांदळाच्या पोत्यात सरकार स्वतःचा हात पुढे करून म्हणतंय, घे, हे तुझं हक्काचं आहे. हा शिधा केवळ मोफत गहू-तांदूळ नव्हता. तो होता एक भावनिक आधार, गरिबांच्या ओंजळीतला आशेचा ठेवा. आणि आज तो सरकारने शांतपणे काढून घेतला. कुठेही गाजावाजा नाही, कोणताही जाहीरनामा नाही.

शिधा म्हणजे केवळ मोफत आतांदळ-गह नव्हे. ती होती एक सामाजिक बांधिलकीची खूण. आणि ही खूण आता सरकारने गुपचूप पुसून टाकलीय. एका सरकारी बैठकीत आनंदाला उठवून लावण्यात आलं. आणि ही बातमी आलीही अशी, जणू काही तांदळाचं भाव थोडंसं वाढल्यागत. मूलभूत गरजांमध्ये अन्नावरचा हक फार प्राथमिक असतो. आणि तो सरकारने दिला तर तो केवळ दयेचा डाव नव्हे, तर तो एक मानवी अधिकारच मानला जातो. पण आजच्या निर्णयात ना तसा अधिकार, ना तशी संवेदनशीलता. कोणत्याही निवेदनात, मंत्र्याच्या वक्तव्यात किंवा सरकारी संकेतस्थळावर 'आनंदाचा शिधा बंद करतोय' असं जाहीर केलं नाही. पण रेशन दुकानांच्या रांगेत उभ्या असलेल्या बाईला, तिच्या शेजारच्या वयोवृद्ध गृहस्थाल, किंवा नुकत्याच लग्न झालेल्या कुटुंबाला आता हे समजतंय की, सरकारचा 'आनंद' संपलाय.

आनंदाचा शिधा ही योजना केवळ अन्नधान्य पुरवणारी नव्हती. ती होती एक संकेत. गरीब कुटुंबाच्या आयुष्यात सरकारचा एक हात पोहोचतोय, ही भावना त्या पिशवीतून घरात उतरायची. खऱ्या अर्थानं, तो 'आनंद' होता गरिबांसाठी. कारण ज्यांच्या अंगणात रोजच्या जेवणाचा प्रश्न असतो, त्यांच्यासाठी मोफत किंवा सवलतीच्या दरातला शिधा म्हणजे आश्वासक भविष्याचं छोटं पाऊल. आणि हे पाऊल आता मागे घेतलं गेलंय. या निर्णयामागे तर्क आहेत. खर्च वाढतोय. केंद्र सरकारने अन्नसुरक्षा कायद्यानुसार दिलेलं मोफत धान्य मिळतंय, राज्याचा निधी कमी आहे, इत्यादी. हे सारे व्यवस्थापन' प्रकारातले मुद्दे, पण प्रश्न व्यवस्थेचा नाही, तो दृष्टिकोनाचा आहे. एकीकडे शाश्वत विकास म्हणत सरकार पायाभूत सुविधा वाढवतंय, ग्रीन हायवे, मेट्रो, नवीन विम ानतळ उभारतोय. आणि दुसरीकडे, ज्यांना दोन वेळचं जेवण देणं हा सरकारचा आद्य कर्तव्याचा भाग होता, त्यांच्याकडून आनंदाचा हक्क काढून घेतलाय. गरिबांसाठी असलेल्या योजना हळूहळू बंद करायच्या. आणि त्यावरच 'सबका साथ, सबका विकास' असं लिहायचं, हे आपल्या राजकीय व्यवस्थेचं एक नविन झालंय. नावात समीकरण योजनांच्या 'आनंद' असतो, पण अंमलबजावणीत तो हरवतो. मग तो पाणी फाऊंडेशनचा उपक्रम असो, की अन्य योजना, की आनंदाचा शिधा. काही काळ गाजतात, प्रचारात येतात आणि मग शांतपणे विस्मृतीत जातात. कोणताही अधिकारी, मंत्री, किंवा योजना संकल्पक याची जबाबदारी घेत मोठी पोकळी आहे. योजनांचं म ूल्य केवळ आकडेवारीत मोजता येत नाही. ते मोजता येतं आयुष्यांमध्ये, त्यांच्यात घडणाऱ्या बदलांमध्ये. आनंदाचा शिया ही अशा बदल घडवणारी योजना होती. रेशनच्या पोत्यात मिळणाऱ्या त्या दोन-चार गोष्टी केवळ

वस्तू नव्हत्या, त्या आशेच्या खुणा होत्या. त्या बंद झाल्याचं दुःख केवळ उपासमारीचं नाही, तर दुर्लक्षित केलं गेल्याचंही आहे. आनंदाचा शिधा हा एकप्रकारे गरिबांच्या चेहऱ्यावरचा हसू देणारा लहानसा गोड मोती होता. एक कुटुंब त्यातला काही भाग मि ळवून, जोपर्यंत मिळवलेलं असतं, तोपर्यंत आशेच्या दृषटिकोनातून जगत असायचं. त्यातील काहीतरी त्यांच्या पोटात जातं, आणि काहीतरी त्यांच्या मनात आशा निर्माण करतं. 'आनंद' केवळ शिधात नाही, तर त्या प्रत्येक गोष्टीत सामावलेला होता. सरकारने त्याला रद्द करत, केवळ आर्थिक विचार केला. पण त्यात तो सर्वांचा जीवनाचा काहीतरी भाग हरवला आहे. गरिबांवरची ही उधळलेली हलकीची ताणतणाव, कुटुंबाच्या आशेच्या लहानशा किडकिडीत सूक्ष्मांकांचं हरवणं हे त्यांनाही समजतंय. हा निर्णय निवडणुकीच्या तोंडावर घेतलेला नाही, हे खरं. पण यामुळे एक गोष्ट स्पष्ट होते, गरिबांचा आवाज हो मतपेटीवर परिणाम करणारी गोष्ट उरलेली नाही. कारण गरिबांचं मत सुरक्षित आहे किंवा अप्रभावी. म्हणूनच त्यांच्या शिध्यावर गदगदीत सरकारचा पहिला घाव बसतो. या पार्श्वभूमीवर, 'आर्थिक जबाबदारी 'चा दाखला देत जर सरकार गरीबांचा शिधा कमी करत असेल, तर ती केवळ बचत नव्हे, तर बेदिली आहे.

गरिबीची संकल्पना आज फक्त आकड्यांमध्ये सापडते. पण ती रोज जगणं असते. एका दिवसाचं तांदूळ, चार दिवसांची डाळ, आणि महागाईच्या काट्यावर जमवलेली कुटुंबाची गणितं. आनंदाचा शिधा हा त्या गणितांचा एक छोटासा स्थिरांक होता. आता तो गेला. सरकारने काहीतरी कमी केलं आहे, हे गरीबांच्या ऑजळीतून निसटलेलं दिसतं. पण सरकारला वाटतं, त्यांनी केवळ शिधा थांबवला आहे. खरंतर त्यांनी 'आनंद' हरवला आहे, गरिबांच्या आयुष्यातील 'आनंद' म्हणजे केवळ पोटभर अन्न नव्हे, तर त्या अन्नातून निर्माण होणारी सुरक्षिततेची भावना.

आज शिधा थांबवून सरकारने त्यांचा उद्याचा आत्मविश्वास कमी केला आहे. उद्या सकाळी घरात काय शिजवायचं, हा प्रश्न पुन्हा कुटुंबाच्या डोक्यावर कोसळतोय. हे केवळ भुकेचं संकट नाही, तर मानवी सन्मानाचं अपमान आहे. कारण गरीबाला मिळणारा प्रत्येक कण हा केवळ भाकर नव्हे, तर जगण्याची खात्री असते. ती खात्री सरकारने हिरावून घेतली, याचं राजकारणात मोजमाप होणार नाही. पण समाजाच्या रगांमधून हळूहळू उसळणारा असंतोष, हीच खरी किंमत ठरणार आहे. शासनाने हरवलेला हा 'आनंद' पुन्हा उगवण्यासाठी आता प्रश्न केवळ सरकारचा नाही, तर संपूर्ण समाजाच्या संवेदनशीलतेचा आहे.




- शिवाजी विठ्ठल चौगुले.
कागल-कोल्हापूर..

# देशाचे सरन्यायाधीश यांच्यावर सर्वोच्च न्यायालयाच्या परिसरात झालेल्या भ्याड हल्ल्याचा निषेध - प्रवीण बागडे



मनुवादी विचारांचा वकील राकेश किशोर याने आज सर्वोच्च न्यायालयाच्या परिसरात 'सनातन का अपमान नही सहेंगे' म्हणत देशाच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश बी.आर. गवई यांच्यावर बुट भिरकावल्याचा अत्यंत नीच प्रकार केला आहे. या निंदनीय प्रकाराचा जाहीर निषेध. देशाचे सरन्यायाधीश यांच्यावर झालेला हल्ला हा केवळ व्यक्तीवरचा हल्ला नसून, भारतीय न्यायव्यवस्था, संविधान आणि लोकशाही व्यवस्थेवर झालेला गंभीर प्रहार आहे. या भ्याड कृत्याचा आम्ही तीव्र शब्दांत निषेध करतो. न्यायव्यवस्था हीच लोकशाहीची खरी हमी आहे आणि त्या व्यवस्थेचे सर्वोच्च पद भूषविणाऱ्या व्यक्तीवरच जर अशा प्रकारचा हल्ला झाला, तर तो संपूर्ण राष्ट्रासाठी चिंताजनक आहे. पाच हजार वर्षांपासून देशाला गुलाम केलेल्या या मनुवादी, वर्णवर्चस्ववादी व्यवस्थेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या म ाध्यमातून मुक्त केले. त्यामुळेच आज एक दलित सरन्यायाधीश न्याय व्यवस्थेच्या सर्वोच्च पदावर विराजमान झालेले या मनुवाद्यांना सहन होत नाही. सरन्यायाधीश यांच्या मातोश्रींनी दोनच दिवसांपूर्वी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यक्रम ाला उपस्थित राहण्यास नकार दिला होता.

लोकशाहीच्या पाया रचणाऱ्या प्रमुख खांबांमध्ये न्यायव्यवस्था ही सर्वात महत्त्वाची आहे. या न्यायव्यवस्थेचे सर्वो च्च पद भूषविणाऱ्या सरन्यायाधीशांवरच जर हल्ला घडला, तर तो केवळ एखाद्या व्यक्तीवर झालेला आघात नसून, भारतीय संविधान, कायदा आणि लोकशाही व्यवस्थेवरच झालेला थेट प्रहार आहे. असा हल्ला हा न्यायव्यवस्थेची प्रतिष्ठा डागाळण्याचा, समाजात भीती आणि असुरक्षिततेचे वातावरण निर्माण करण्याचा, तसेच न्यायावरचा विश्वास डळमळीत करण्याचा कपटी प्रयत्न आहे. सर्वोच्च न्यायालयाचा परिसर जो देशातील न्यायमंदिर मानला जातो तिथेच अशा प्रकारची घटना घडणे हे अतिशय चिंताजनक आहे. हा देश संविधानाने दिलेल्या स्वातंत्र्य, समता आणि बंधूतेच्या मुल्यांवर उभा आहे. संविधानाने दिलेल्या सामाजिक न्याय आणि समान संधीच्या तत्वामुळे मनुवाद्यांच्या पोटात मळमळ होत आहे. आज देशात उजव्या विचारांची सत्ता आहे, विषमतावादी आरएसएस ने शतकपूर्ती केलेली आहे, अशा काळात एक दलित व्यक्ती न्यायपीठाच्या सर्वोच्च पदावर बसलेला या मनुवाद्यांच्या डोळ्यात खुपत आहे.

लोकशाही शासनपद्धती आणि कायद्याचे राज्य या मनुवाद्यांना उलथवून टाकून मनुवादी व्यवस्था पुनर्स्थापित करायची आहे. हेच त्यांच्या अखंड भारताचे स्वप्न आहे. भ्याडपणे हल्ला करणाऱ्यांचा निषेध करणे पुरेसे नाही, तर अशा प्रवृत्तींचा कायमस्वरूपी बंदोबस्त करणे गरजेचे आहे. गुन्हेगारांना तातडीने अटक करून कठोरात कठोर शिक्षा देणे हे न्यायव्यवस्थेप्रती खरी बांधिलकी ठरेल. या घटनेमुळे नागरिकांम ध्ये संताप आहे आणि हा संताप स्वाभाविकही आहे. कारण सरन्यायाधीशांवर हल्ला म्हणजे देशातील सामान्य माणसाच्या हक्कांवर आणि सुरक्षिततेवर हल्ला होय. समाजाने, माध्यमांनी आणि सत्ताधाऱ्यांनी मिळून या प्रकरणात स्पष्ट व ठाम भूमिका घेतली पाहिजे. न्यायालयाची प्रतिष्ठा, संविधानावरील विश्वास आणि लोकशाहीचे रक्षण ही आपल्या सर्वांचीच जबाबदारी आहे. या घटनेत सामील आरोपींना तात्काळ अटक करून कठोरात कठोर शिक्षा दिली जावी, अशी आमची ठाम मागणी आहे. न्यायालयाचे गौरव, प्रतिष्ठा आणि स्वायत्तता यांचे रक्षण करणे हे सर्वसामान्य जनतेचे, माध्यम ांचे तसेच शासनाचे सामूहिक कर्तव्य आहे.

सरन्यायाधीशांवर हल्ला म्हणजे न्यायाच्या मंदिरातील शुद्धतेवर आघात! लोकशाहीत हा अपराध कधीच सहन केला जाणार नाही.

**- प्रवीण बागडे**
**नागपूर, ९९२३६२०९१९**

# देशाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर हल्ल्याचा प्रयत्न हि धोक्याची घंटा...

सर्वोच्च न्यायालयात एका महत्वाच्या सुनावणी दरम्यान भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर एका वकिलाने बुट फ ेकून कोर्टातच हल्याचा प्रयत्न केल्याचे वृत्त समोर आले आहे.

त्यामुळे पुन्हा एकदा कायदा व सुव्यवस्थेचा बोजवारा उडाल्याचे अधोरेखित झाले आहे एका सर्वोच्च मानाच्या पदावरील सरन्यायाधीशांचा बुट फेकून त्यांना अपमानित करण्यात येतं असेल तर सर्वसामान्यांचे काय ? असले हल्ले नवीन नाहीत अनेक वेळा शाई फेकणे, अधिकाऱ्यांवर धावून जाणे संसदेत, विधानसभेत आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झडून वादंग, हल्ले झाल्याच्या घटना आपण पाहिल्या आहेत. पण हे सर्व वेगळ्या दिशेने जाते आहे न्यायाच्या हक्कासाठी झगडणाऱ्या वकिलाची हल्ला करण्याची हिम्मत कशी झाली यामागे कुठली आदृष्य शक्ती आहे का ? हा देखील प्रश्न उपस्थित होतो आहे न्यायदेवतेच्या मंदिरातच असल्या घटना घडू लागल्या तर विश्वास कोणावर ठेवायचा मध्य प्रदेशातील खजुराहो येथे भगवान विष्णूंच्या ७ फूट उंच शिरच्छेदित पुतळ्याच्या जीर्णोद्धारांवर गवई यांच्या टिप्पण्यांमुळे वकिल नाराज आहेत त्यातूनच हा हल्ला झाल्याचे बोलले जात आहे मात्र कितीही वकील नाराज असले तरी असला लज्जास्पद आणि घृणास्पद प्रकार खपवून घेतला नसला पाहिजे लोकशाही आणि संविधानाच्या मूल्यांना आधार म ानून वाद प्रतिवादातून न्याय भूमिकेकडे जाण्यासाठी न्यायव्यवस्था असते आणि तेथेच सरन्यायाधीशांवर आशा प्रकारे हल्ला होणे हा केवळ न्यायव्यवस्थेचाच नव्हे तर लोकशाहीचा, संविधानाचा आणि पर्यायाने देशाचा घोर अवमान आहे याचा गांभीर्याने विचार करणे अपेक्षित आहे !

**- राजू जाधव,**
**मांगूर जि. बेळगांव**

## कफ सिरप..

कफ सिरपची भेसळ
आला नवीन खोकला
दोष आहे हो कुणाचा
एकदुस-यांवर ढकला

मनात रुतली खदखद
कुणीभडभड ओकला
अफवांचाकफ असह्य
सर्रास जातोयं विकला

झाली कशी ती भेसळ
समोर आण रे दाखला
कडक शासन जरुरीचे
जोही गुन्ह्यांत माखला

शिंतोडे आहे अपेक्षित
हातघालताना चिखला
जालीम देऊनि उतारा
भ्रष्ट व्याधीला हाकला

समाज कंटक मातलेले
आरोग्यविभागखोकला
असो कुणीही मुळाशी
वेळेवर जाऊ दे रोखला

भेसळ विरोध करताना
कडककायदाहीथकला
शोधूनकाढा हितसंबंध
रे कोणकमरेत वाकला

जाण ऋग्णांच्या वेदना
खोकून ओकून थकला
काळ जातो रे सोखला
निरपराधी प्राणामुकला

**- हेमंत मुसरीक, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## केज न्यायालय इमारतीच्या दुसऱ्या मजल्याला मंजुरी

**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.०६, केज (बीड) :** वाढत्या न्यायालयीन कामकाजामुळे जागेची कमतरता भासत असलेल्या केज येथील न्यायालयाच्या इमारतीवर दुसरा मजला बांधण्यास शासनाने अखेर मंजुरी दिली आहे. आमदार नमिता मुंदडा यांनी यासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळून रु. ७ कोटी ७६ लाख ५० हजारांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. विधी व न्याय विभागाच्या दिनांक ०६ ऑक्टोबर २०२५ रोजी जारी आदेशानुसार, हे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिपत्याखाली करण्यात येणार आहे. आ.मुंदडा यांनी न्यायालयाच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन शासन दरबारी वारंवार ही मागणी मांडली होती. या मंजुरीमुळे केज तालुक्यातील न्यायव्यवस्थेसाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांचा विकास होणार असून, नागरिकांसाठी अधिक सुटसुटीत आणि सुविधा-संपन्न व्यवस्था उपलब्ध होणार आहे. या कामासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मंत्री पंकजा मुंडे यांचे आमदार नमिता मुंदडा यांनी विशेष आभार मानले आहेत.

## के.रामलू शाळेची विद्यार्थिनी अक्षरा नीलपवार कुस्ती स्पर्धेत जिल्हा स्तरावर प्रथम

**अक्षराज : दत्ता हमंद**



**दि.०७, कुंडलवाडी (नांदेड) :** दिनांक ०७ ऑक्टोबर २०२५ रोजी जिल्हा क्रिडा संकुल इंडोर हॉल नांदेड येथे झालेल्या जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत बिलोली तालुक्यातील कुंडलवाडी येथील के.रामलू शाळेच्या विद्यार्थिनीने वय वर्ष १४ वयोगटात ६२ किलो वजनी गटातील कु. अक्षरा शंकर नीलपवार या विद्यार्थिनीने जिल्हा स्तरीय कुस्ती स्पर्धेत ६२ किलो वजनी गटात प्रथम क्रमांक पटकवला आहे. तसेच विभागीय स्तरासाठी तिची निवड झाली आहे. या पूर्वी देखील नीता गायकवाड ही के.रामलू शाळेच्या विद्यार्थिनीने विभागीय स्तरासाठी पात्र ठरली होती. आज देखील कु.अक्षरा शंकर नीलपवार ही विद्यार्थिनी शाळेतून दुसऱ्यांदा विभागीय स्तरावर कुस्ती प्रकारात मजल मारली आहे. या यशस्वी विद्यार्थिनीचेसंस्थेचे अध्यक्ष साईरेड्डी ठक्कुरवार, सचिव यशवंत संगमवार, संचालिका रमा ठक्कुरवार प्रिंसिपल जे.संभाजी व्हाय प्रिंसिपल एम सपना यांनी अभिनंदन केले. व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यशस्वी विद्यार्थिनीला क्रीडा शिक्षक कासलोड, श्री.कामाजी, मार्गदर्शक शिक्षिका नरोड अर्चना यांचे मार्गदर्शन लाभले.

## सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश यांच्यावर झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ आरोपीवर कठोर कारवाई करण्याची मागणी

**अक्षराज : विश्वास वराळे**



**दि.०७, धाराशिव :** कळंब येथील उपविभागीय अधिकारी संजय पाटील यांच्या मार्फत देशाचे राष्ट्रपती यांना सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश बी.आर.गवई यांच्या वर झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ दि.०७ ऑक्टोबर २०२५ रोजी लोकजनशक्ती पार्टीच्या वतीने जिल्हाध्यक्ष राजाभाऊ गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देऊन निषेध व्यक्त करण्यात आला. दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश बी.आर.गवई यांच्यावर वकील राकेश किशोर या व्यक्तीने केलेला हल्ल्याचा प्रयत्न हा केवळ एका व्यक्तीवर नव्हे, तर भारतीय न्यायव्यवस्थेवर आणि संविधानाच्या मूल्यांवर झालेला गंभीर हल्ला आहे. ही घटना समाजातील मनुवादी आणि जातीयवादी प्रवृत्तीचे दर्शन घडवते, जी लोकशाही आणि सामाजिक समतेसाठी धोकादायक आहे असे निवेदनात म्हटले आहे. तसेच लोकजनशक्ती पार्टी च्या वतीने काही मागण्या करण्यात आल्या आहेत.

यामध्ये,आरोपी वकील राकेश किशोर याच्यावर कठोर कलमान्वये कारवाई करण्यात यावी, सर्वोच्च न्यायालय तसेच सर्व न्यायालयांमध्ये सुरक्षा व्यवस्था अधिक मजबूत करण्यात यावी, जातीय द्वेष आणि मनुवादी प्रवृत्तीला प्रोत्साहन देणाऱ्या घटकांवर चौकशी करून कारवाई करण्यात यावी. आम्ही या घटनेचा तीव्र निषेध करतो आणि न्यायव्यवस्थेच्या गौरवाचे रक्षण करण्यासाठी तातडीने कारवाई करावी. अशी मागणी करण्यात आली आहे. या निवेदनावर जिल्हाध्यक्ष राजाभाऊ गायकवाड, नागेश धिरे, मुकेश गायकवाड, भारत कदम, बाबासाहेब टोपे, सुंदर जगताप, राजाभाऊ खांडेकर यांच्या स्वाक्षरी आहेत.

# राज्यातील २४७ नगरपरिषदा आणि १४७ नगर पंचायतींच्या नगराध्यक्ष पदांची आरक्षण सोडत जाहीर

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०७, मुंबई :** राज्यातील २४७ नगरपरिषदा आणि १४७ नगर पंचायतींच्या नगराध्यक्ष पदांची आरक्षण सोडत नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या उपस्थितीत पार पडली. यावेळी नगर विकास विभागांचे अपर मुख्य सचिव डॉ.के.एच. गोविंदराज, उपसचिव प्रियांका कुलकर्णी, छापवाले, उपसचिव विद्या हम्पय्या, अनिरुद्ध जेवळीकर, यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते. राज्यातील २४७ नगरपरिषदेपैकी ३३ पदे अनुसूचित जातींसाठी व ११ पदे अनुसूचित जमातीसाठी आणि ६७ पदे नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी आरक्षित झाली आहेत. तर १३६ पदे खुल्या प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आली आहेत.

### नगरपरिषद आरक्षण पुढील प्रमाणे :-

नगर परिषदांमधील अनुसूचित जातीसाठी आरक्षित पदे (एकूण ३३ पदे)

अनुसूचित जाती महिलांसाठी आरक्षित नगरपरिषद (१७ पदे) -

१. देऊळगाव राजा, २. मोहोळ, ३. तेल्हारा, ४. ओझर, ५. वाना डोंगरी (नागपूर), ६. भुसावळ, ७. घुग्घुस, ८. चिमूर, ९. शिर्डी, १०. सावदा, ११. मैंदर्गी, १२. डिगडोह(देवी), १३. दिग्रस (यवतमाळ), १४. अकलूज, १५. परतूर, १६. बीड, १७. शिरोळ

**अनुसूचित जाती प्रवर्गासाठी (सर्वसाधारण) आरक्षित नगरपरिषद (१६ पदे)**

१. पांचगणी, २. हुपरी, ३. कळमेश्वर, ४. फुरसुंगी ऊरुळी-देवाची, ५. शेगांव, ६. लोणावळा, ७. बुटीबोरी, ८. आरमोरी, ९. मलकापूर जि.सातारा, १०. नागभिड, ११. चांदवड, १२. अंजनगांवसूर्जी, १३. आर्णी, १४. सेलू, १५. गडहिंग्लज, १६. जळगांव-जामोद,

**अनुसूचित जमाती या प्रवर्गासाठी आरक्षित नगर परिषदा :-**

अनुसुचित जमातीसाठी एकूण ११ पदांपैकी ६ पदे महिलांसाठी आरक्षित आहेत.

अनुसुचित जमाती महिलांसाठी आरक्षित (६ पदे)

१. पिंपळनेर, २. शेंदूरजनाघाट, ३. भडगांव, ४. यवतमाळ, ५. उमरी, ६. वणी

**अनुसुचित जमाती सर्वसाधारण प्रवर्ग (५ पदे)**

१. पिंपळगांव-बसवंत, २. राहुरी, ३. एरंडोल, ४. अमळनेर, ५. वरुड

**नागरिकांचा मागास प्रवर्ग या प्रवर्गासाठी नगर परिषदा :-**

एकूण २४७ नगरपरिषदांमधून ६७ पदे नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी आरक्षित ठेवण्यात आली आहेत.

**नागरिकांचा मागास प्रवर्गातील (सर्वसाधारण) आरक्षित पदे (३३ पदे)**

१. तिरोडा, २. वाशिम, ३. भद्रावती, ४. परांडा, ५. नंदुरबार, ६. खापा, ७. शहादा, ८. नवापूर, ९.त्र्यंबक, १०. कोपरगांव, ११. मंगरुळपीर, १२. कन्हान-पिंपरी, १३. पाथर्डी, १४. रामटेक, १५, नशिराबाद, १६.पालघर, १७. वरणगांव, १८. मलकापूर, जि.बुलडाणा, १९. इस्लामपूर, २०. मोहपा, २१. तुमसर, २२. महाड, २३. राहता, २४. श्रीवर्धन, २५. ब्रम्हपूरी, २६. दर्यापूर, २७. वैजापूर, २८. गोंदिया, २९. सांगोला, ३०. वर्धा, ३१. येवला, ३२. कंधार, ३३. शिरपूर-वरवाडे.

**नागरिकांच्या मागास प्रवर्गातील महिलांसाठी राखीव पदे (३४ पदे)**

१. धामणगांव रेल्वे, २. भोकरदन, ३. भगूर, ४. मालवण, ५. वरोरा, ६. हिंगोली, ७. मोर्शी, ८. उमरेड, ९. हिवरखेड, १०. बाळापूर, ११. शिरुर, १२. कुळगांव-बदलापूर, १३. देगलूर, १४. नेर-नबाबपूर, १५. धाराशिव, १६. इगतपूरी, १७. माजलगांव, १८. मुल, १९. बल्लारपूर, २०. जुन्नर, २१. कुर्डूवाडी, २२. औसा, २३. मुरुड-जंजिरा, २४. अकोट, २५. विटा, २६. चोपडा, २७. सटाणा, २८. काटोल, २९. दौंड, ३०. रोहा, ३१. देसाईगंज, ३२. पुलगांव, ३३. कर्जत, जि.रायगड, ३४. दोंडाईचा-वरवाडे.

**खुल्या प्रवर्गातील नगर परिषदांचे आरक्षित**

एकूण २४७ पैकी १३६ पदे ही खुल्या प्रवर्गासाठी आरक्षित असून यापैकी ६८ पदे ही महिलांसाठी राखीव आहेत.

**खुला प्रवर्ग (सर्वसाधारण)**

१ फलटण, २ अहमदपूर, ३ पाथरी, ४ चाळीसगांव, ५ तळोदा, ६ वाई, ७ नांदगांव, ८ जयसिंगपूर, ९ निलंगा, १० लोहा, ११ खोपोली, १२ राजगुरूनगर १३ कराड, १४ जेजुरी, १५ उमरगा, १६ आळंदी, १७ पुसद, १८ बारामती, १९ जत, २०. पारोळा, २१ तळेगांव-दाभाडे, २२ सासवड, २३ गडचांदुर, २४ रिसोड, २५ वेंगुर्ला, २६ पातूर, २७ किल्लेधारुर, २८ चिखली, २९ मेहकर, ३० दारव्हा, ३१ सिल्लोड, ३२ सिन्नर, ३३ देवळी, ३४ मुरूम, ३५ वडगांव, ३६ महाबळेश्वर, ३७ आष्टा, ३८ दुधणी, ३९ कुंडलवाडी, ४० खुलताबाद, ४१ नरखेड, ४२ राजूरा, ४३ सिंदखेडराजा, ४४ वाडी, ४५ डहाणू, बीबी४६ देवळाली-प्रवरा, ४७ कामठी, ४८ अक्कलकोट, ४९ सातारा, ५० भोर, ५१ इंदापूर, ५२ चिपळून, ५३ माथेरान, ५४ श्रीगोंदा, ५५ श्रीरामपूर, ५६ मनमाड, ५७ नळदुर्ग, ५८ भोकर, ५९ बिलोली, ६० अंबेजोगाई, ६१ जिंतूर, ६२ सोनपेठ, ६३ गंगापूर, ६४ पांढरकवडा, ६५ घाटंजी, ६६ मुर्तीजापूर, ६७ चिखलदरा, ६८ तुळजापूर.

**खुला प्रवर्गातली महिलांसाठी नगरपरिषदा**

१. परळी-वैजनाथ, २. मुखेड, ३. अंबरनाथ, ४. अचलपूर ,५. मुदखेड ६. पवणी ७. कन्नड, ८. मलकापूर, जि.कोल्हापूर, ९. मोवाड, १०. पंढरपूर, ११. खामगांव, १२. गंगाखेड, १३. धरणगांव , १४.बार्शी, १५. अंबड, १६. गेवराई, १७. म्हसवड, १८. गडचिरोली, १९. भंडारा, २०. उरण, २१. बुलडाणा, २२. पैठण, २३. कारंजा, २४. नांदुरा, २५. सावनेर, २६. मंगळवेढा, २७. कळमनूरी, २८. आर्वी, २९. किनवट, ३०. कागल, ३१. संगमनेर, ३२. मुरगुड, ३३. साकोली, ३४ कुरुदंवाड, ३५ पुर्णा, ३६ कळंब, ३७ चांदुररेल्वे, ३८ चांदुरबाजार, ३९ भुम, ४० रत्नागिरी, ४१ रहिमतपूर, ४२ खेड, ४३ करमाळा, ४४ वसमत, ४५ हिंगणघाट, ४६ रावेर, ४७ जामनेर, ४८ पलुस, ४९ यावल, ५० सावंतवाडी, ५१ जव्हार, ५२ तासगांव, ५३ राजापूर, ५४ सिंधीरेल्वे, ५५ जामखेड, ५६ चाकण, ५७ शेवगांव, ५८ लोणार, ५९ हदगांव, ६० पन्हाळा, ६१ धर्माबाद, ६२ उमरखेड, ६३ मानवत, ६४ पाचोरा, ६५ पेण, ६६ फैजपूर, ६७ उदगीर, ६८ अलीबाग.

**नगर पंचायतीचे आरक्षण**

राज्यातील १४७ नगरपंचायतींच्या नगराध्यक्ष पदांचे आरक्षण आज काढण्यात आले. यामध्ये अनुसूचित जातीसाठी एकूण १८ जागा आरक्षित असून यामध्ये महिलांसाठी ९ व सर्वसाधारण साठी ९ पदे आरक्षित आहेत. तर अनुसूचित जमातीसाठी १३ जागा असून त्यामध्ये ७ जागा महिलांसाठी व ६ जागा सर्वसाधारण गटासाठी आहेत. तर नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी एकूण ४० पदे आरक्षित असून त्यामध्ये २० जागा महिलांसाठी व २० जागा सर्वसाधारण गटासाठी आहेत. खुल्या प्रवर्गासाठी एकूण ७६ जागा असून ३८ जागा महिलांसाठी व ३८ जागा या सर्वसाधारण गटासाठी आरक्षित आहेत.

**अनुसूचित जाती या प्रवर्गासाठी राखीव :-**
**महिलांसाठी आरक्षित नगरपंचायती (९ पदे)**

निलडोह, २. गोधनी (रेल्वे), ३. कोरची, ४. बहादुरा, ५. धानोरा, ६. गौंडपिंपरी, ७. ढाणकी, ८. अहेरी, ९. बेसा-पिपळा

**अनुसूचित जाती प्रवर्ग (सर्वसाधारण)**

येरखेडा, कांद्री (कन्हान), भिसी, कुरखेडा, देवरी, माळेगांव(ब्रु.), बिडगांव-तरोडी (खुर्द)-पांढुर्णा, भातकुली, दहीवडी.

**अनुसूचित जमाती या प्रवर्गासाठी राखीव :-**
**महिलांसाठी आरक्षित नगर पंचायती (७ पदे)**

भिवापूर, अर्जुनी-मोरगांव, सिरोंचा, हिंगणा, समुद्रपूर, पाली, देवळा.

**अनुसूचित जमाती (सर्वसाधारण) (६ पदे)**

कोरपणा, कळंब, माणगांव, गोरेगांव, सेलू , सिंदेवाही

**नागरिकांचा मागास प्रवर्ग या प्रवर्गासाठी राखीव (४० पदे) :-**

**सर्वसाधारण गटासाठी आरक्षित (२० पदे)**

पारनेर, तळा, खानापूर, पालम, मंठा, कोंढाळी, माळशिरस, एटापल्ली, झरी-जामणी, पोंभूर्णा, माहूर, आटपाडी, मालेगांव-जहांगिर, तिर्थपूरी, कणकवली, शिरुर-कासार, विक्रमगड, अकोले , मोखाडा, सुरगणा.

**नागरिकांचा मागास प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षित (२० पदे)**

घनसावंगी, भामरागड, मंचर, पाटोदा, माढा, कळवण, सावली, मानोरा, मारेगांव, आष्टी, जि.वर्धा, तलासरी, वडवणी, पोलादपूर, खालापूर, शिरुर-अनंतपाळ, जाफ्राबाद, चाकूर, आष्टी, जि.बीड, जिवती, कर्जत, जि.अहिल्यानगर.

**खुल्या प्रवर्गासाठी नगर पंचायती (एकूण ७६ पदे)**

खुला (सर्वसाधारण) (३८ पदे)

शेंदूर्णी, साक्री, सालेकसा, कवठे-महांकाळ, देवणी, मोताळा, अर्धापूर, बोदवड, हिमायतनगर, कसई-दोडामार्ग, मुलचेरा, धडगांव-वडफळ्या, कुडाळ, कोरेगांव, दापोली, वाभवे-वैभववाडी, निफाड, चंदगड, चार्मोर्शी, बदनापूर, कारंजा, धारणी, फुलंब्री, हातकणंगले, लोहारा (ब्रु.), मुरबाड, केज, आजरा, संग्रामपूर, खंडाळा, वडूज, देवगड-जमसंडे, नेवासा, मौदा, शिराळा (जि.सांगली), नायगाव, सेनगाव, महागाव.

**खुला प्रवर्गातील महिलांसाठी :- (पदे ३८)**

१. बाभुळगांव, २. मुक्ताईनगर, ३. कुही, ४. देहू, ५. शहापूर, ६. पारशिवनी, ७. वडगांव-मावळ, ८. तिवसा, ९. मंडणगड, १०. शिंदखेडा, ११. लांजा, १२. देवरुख, १३. वाडा, १४. लोणंद, १५. मेढा, १६. जळकोट, १७. दिंडोरी, १८. सडक-अर्जुनी, १९. म्हसळा, २०. नातेपुते, २१. रेणापूर, २२. लाखणी, २३. औंढा-नागनाथ, २४. पाटण, २५. पेठ, २६. कडेगांव, २७. अनगर, २८. महादूला, २९. सोयगांव, ३०. वैराग, ३१. लाखांदूर, ३२. राळेगांव, ३३. गुहागर, ३४. नांदगांव-खडेश्वर, ३५. महाळुंग-श्रीपूर, ३६. वाशी, जि.धाराशिव, ३७. बार्शी-टाकळी, ३८. मोहाडी.

**आरक्षण सोडत पारदर्शकपणे राबविली - राज्यमंत्री माधुरी मिसाळ**

राज्यातील नगरपरिषदा व नगर पंचायतीच्या नगराध्यक्ष पदांची आरक्षण सोडत प्रक्रिया पारदर्शकपणे राबविण्यात आली, असे सांगून महिला प्रवर्गासाठी आरक्षित जागांवर निवडणूक लढविणाऱ्या भगिनींना तसेच या निवडणुकीसाठी सर्वांना नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी शुभेच्छा दिल्या.

# महिला पत्रकारला मारहाण व अश्लील वर्तन

## मुंब्रा-पनवेल रोडवरील धक्कादायक घटना

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०७, मुंब्रा (ठाणे) :** मुंब्रा-पनवेल रोडवरील मित्तल ग्राउंड परिसरात महिला पत्रकार सनम रफिक कामदार (वय ३६ वर्षे) यांच्यावर मारहाण व गैरवर्तनाची गंभीर घटना घडली आहे. प्राप्त माहितीनुसार, पत्रकार सनम कामदार या महाराष्ट्र टुडेज न्यूज चॅनेलमध्ये कार्यरत असून त्यांच्या पतीसह पत्रकार म्हणून काम करतात. दिनांक ०५ ऑक्टोबर २०२५ रोजी रात्री सुमारे ८.१५ वाजण्याच्या सुमारास मित्तल ग्राउंड येथे वाहतूक कोंडी झाल्याने त्या घटनास्थळी न्यूज कव्हरेजसाठी गेल्या होत्या. त्यावेळी काही व्यक्ती फज्जु, अरमान, फरमान, छोटु आणि असद हे त्यांच्या पतीसोबत वाद घालत असल्याचे दिसून आले. पत्रकार सनम कामदार यांनी परिस्थिती शांत करण्याचा प्रयत्न करत



असताना, अरमान नावाच्या इसमाने त्यांच्या हातातील आयफोन आणि सॅमसंग मोबाईल फोन स्टिकसह हिसकावून मोबाईल स्टिक तोडून - टाकली. यानंतर वरील इसमांनी पत्रकार कामदार यांच्यावर शारीरिक व अश्लील प्रकारे हातघाई करत लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले. घटनेदरम्यान उपस्थित महिला वाहतूक पोलिसांनी वाद शांत करण्याचा प्रयत्न केला व पत्रकार कामदार यांना रिक्षाने पोलीस ठाण्यात जाण्यास सांगितले. मात्र रिक्षामध्ये जात असताना, अरमानने रिक्षा थांबवून शिवीगाळ करत बघून घेईन अशी धमकी दिली, तसेच त्याच्यासोबत असलेल्या दोन महिलांनीही पत्रकारावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला.

या सर्व प्रकारानंतर पत्रकार सनम रफिक कामदार यांनी मुंब्रा पोलीस ठाण्यात अधिकृत तक्रार दाखल केली असून, आरोपींवर कठोर कारवाई करण्यात यावी. अशी मागणी पत्रकार संघटनांनी केली आहे. ही घटना पत्रकार सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न निर्माण करणारी असून, महिला पत्रकारांवरील अशा प्रकारच्या हल्ल्याचा सर्व स्तरातून व द युवा ग्रामीण पत्रकार संघ ठाणे यांच्या तर्फे निषेध व्यक्त करण्यात येत आहे.

# महामार्ग व अनुकंपा नियुक्ती निर्णयाबद्दल आ.जोरगेवार यांनी मुख्यमंत्री यांचे मानले आभार

## मुंबई मंत्रालयात घेतली भेट

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०७, चंद्रपूर :** नागपूर ते चंद्रपूर २०४ किमी लांबीच्या मार्गासाठी २ हजार ३५३ कोटी रुपयांच्या प्रस्तावाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंजुरी दिली आहे. तसेच चंद्रपूर ते मूल मार्गाला मंजुरी देण्यात आली आहे. यासह राज्यभरातील १० हजार ३०९ अनुकंपाधारकांना एकाच दिवशी नोकरी देण्यात आली आहे. या महत्त्वपूर्ण निर्णयाबद्दल आमदार किशोर जोरगेवार यांनी मंगळवार, दिनांक ०७ ऑक्टोबर २०२५ रोजी मुंबई येथे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांचे अभिनंदन केले आणि आभार मानले आहेत. विदर्भाच्या सर्वांगीण विकासाला गती देणारा ऐतिहासिक निर्णय राज्य सरकारने घेतला आहे २ हजार ३५३ कोटी रुपयांच्या निधीतून



नागपूर ते चंद्रपूर दरम्यानच्या २०४ किमी लांबीच्या चारपदरी सिमेंट काँक्रीट महामार्गाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. हा महामार्ग विदर्भाच्या आर्थिक, औद्योगिक आणि पर्यटन विकासासाठी नवी दिशा ठरणार आहे. तसेच, राज्यातील १० हजारांहून अधिक अनुकंपाधारकांना तसेच चंद्रपूर जिल्ह्यातील २८५ अनुकंपाधारकांना नियुक्ती देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेऊन अनेक कुटुंबांना दिलासा देण्यात आला आहे. या निर्णयामुळे अनेक वर्षांपासून प्रतीक्षेत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबांना न्याय मिळाला असून प्रशासनात नवा उत्साह निर्माण झाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली विदर्भाचा विकास निश्चितपणे नव्या उंचीवर पोहोचेल. नागपूर - चंद्रपूर चौपदरी महामार्गामुळे चंद्रपूर क्षेत्रातील वाहतुकीला नवी गती मिळेल, गुंतवणुकीस चालना मिळेल आणि स्थानिक रोजगाराच्या संधी वाढतील. तसेच, अनुकंपा नियुक्तीच्या निर्णयामुळे शासनाची संवेदनशीलता दिसून येते, असे आमदार किशोर जोरगेवार यांनी म्हटले आहे. या भेटीत आ.जोरगेवार यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याशी मतदारसंघातील विविध विकासकामांबाबत चर्चा केली आहे.

# शेत रस्त्याचे, सिमांचे सिमांकन होईपर्यंत पाणंद रस्ते योजना थांबवा - पवळे

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.०७, सुपा(अहिल्यानगर) :** महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचे अध्यक्ष शरद पवळे यांनी बळीराजा पाणंद रस्ते योजना आणि शेतरस्ता नियमांच्या अंमलबजावणीपूर्वी सर्व शेतरस्त्यांचे स्पष्ट सीमांकन पूर्ण करणे बंधनकारक असल्याची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

पवळे यांनी सांगितले की, राज्य शासनाने या योजनेअंतर्गत ४०,००० हून अधिक पाणंद रस्ते तयार करण्याचे उद्दिष्ट ठेवले असून, महसूल विभागाद्वारे शेतरस्त्यांचे नोंदणीकरण व सीमांकन प्रक्रिया सुरू आहे. मात्र, प्रत्यक्ष अंमलबजावणीदरम्यान रस्त्यांचे स्पष्ट सीमांकन न झाल्याने अनेक ठिकाणी वाद, तक्रारी व अडचणी निर्माण होत आहेत.



**●प्रमुख मागण्या :**

१. सर्व शेतरस्ते व पाणंद रस्त्यांचे सीमांकन पूर्ण करूनच अंमलबजावणी करावी.

२. सीमांकनानंतरच अतिक्रमणाची नोंद व त्यावरील कारवाई करावी.

३. जाणूनबुजून अतिक्रमण करणाऱ्यांवर कठोर कारवाई, तर सीमा अस्पष्टतेमुळे झालेल्या प्रकरणात पुनर्स्थापनेची संधी द्यावी.

४. ग्रामपंचायत, महसूल व कृषी विभागाचे संयुक्त सवेक्षण पथक तयार करावे.

५. जिल्हा व तालुका समित्यांचे अहवाल ग्रामपंचायत पातळीवर सार्वजनिक करावेत.

६. सर्व शेतरस्त्यांवर नंबरी दगड (सीमा खूण) लावण्याची अंमलबजावणी तातडीने करावी.

पवळे यांनी पुढे म्हटले की, छत्रपती शिवाजी महाराज स्वाभिमान अभियान अंतर्गत सुरू झालेल्या पाणंद रस्ते मोहिमेमुळे अनेक शेतकऱ्यांना लाभ झाला असला तरी, १५ दिवसांच्या मोहिमेचा कालावधी वाढवून ती सातत्याने राबविणे आवश्यक आहे.

त्यांनी भर दिला की, या योजनेचा मुख्य हेतू म्हणजे ग्रामीण भागातील वाहतूक सुलभ करणे आणि शेतकऱ्यांचा सर्वांगीण विकास साधणे हा आहे. त्यामुळे अंमलबजावणी करताना न्याय, पारदर्शकता आणि जनहित या तत्त्वांचे पालन होणे अत्यावश्यक आहे.

# वॉरिअर तायक्वांदो अकॅडमीचा झोनल तायक्वांदो स्पर्धेत विजयाचा डंका

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०७, नवी मुंबई :** वॉरिअर तायक्वांदो अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी प्रशिक्षक मा. मंगेश ओटी यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली उत्कृष्ट कामगिरी करत झोनल तायक्वांदो स्पर्धा २०२४–२५ मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले. ही स्पर्धा शेठ स्कूल, अंधेरी येथे पार पडली.

या स्पर्धेचे आयोजन तायक्वांदो असोसिएशन ऑफ सब मुंबई यांच्या वतीने करण्यात आले होते. अकॅडमीच्या तरुण खेळाडूंनी कौशल्य, शिस्त आणि जिद्द यांचा उत्तम संगम दाखवत २ सुवर्ण आणि ७ कांस्य पदके पटकावली. या कामगिरीमुळे अकॅडमीने पुन्हा एकदा आपल्या यशाची परंपरा कायम ठेवली आहे.




**सुवर्णपदक विजेते :**

वेदांत कोर्डे – अंडर १७ गट, ४१ किलो वजन गट

वृषाली पारुळेकर – अंडर १९ गट, ४९ किलो वजन गट

या दोन्ही सुवर्णपदक विजेत्यांची राज्यस्तरीय तायक्वांदो स्पर्धेसाठी निवड झाली असून, ही स्पर्धा १३ ते १६ ऑक्टोबर २०२५ दरम्यान संभाजीनगर येथे होणार आहे.

**कांस्यपदक विजेते :**

देव गाठणकर, समर्थ मोटे, भार्गव हुमणे, वीरेन्द्र कुमार, आर्या राज, ऋषिता डांडोपाट, आराध्या गुरव

प्रशिक्षक मंगेश ओटी यांनी विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल अभिमान व्यक्त करत सांगितले, आमचे खेळाडू सातत्यपूर्ण कामगिरी करत अकॅडमीचा अभिमान वाढवत आहेत. त्यांची मेहनत, जिद्द आणि चिकाटी त्यांना राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील मोठ्या यशाकडे घेऊन जाईल. वॉरिअर तायक्वांदो अकॅडमी ही नवी मुंबईतील अग्रगण्य मार्शल आर्ट्स संस्था असून, तायक्वांदो, किकबॉक्सिंग आणि बॉक्सिंग या खेळांमधील नवे चॅम्पियन घडविण्याचे कार्य सातत्याने करत आहे.

# कल्याण तहसिल कार्यालयात महसूल अदालत हा नाविण्यपूर्ण उपक्रम संपन्न

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०७, कल्याण (ठाणे) :** कल्याण तालुक्यामध्ये दि.१७ सप्टेंबर पासून छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत सेवा पंधरवडा राबविण्यात आला असून या मोहिमेमध्ये जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्या संकल्पनेतून महसूल अदालत हा उपक्रम राबविण्याचे निर्देश दिले होते.

त्यानुषंगाने तहसिल कार्यालयात दि.०१ ऑक्टोबर २०२५ रोजी महसूल अदालत हा नाविण्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आला.

या अभियानांतर्गत एकूण १६ प्रकरणासाठी महसूल अदालत राबविण्यात आली असून त्याकरिता कल्याण कोर्टातील सर्व अधिवक्ता / मंडळ अधिकारी / ग्राम महसूल अधिकारी यांना कळविण्यात आले होते. प्रलंबित असलेल्या प्रकरणांच्या अनुषंगाने तहसिलदार व नायब तहसिलदार यांच्या समक्ष चालणारी एकूण १६ प्रकरणे महसूल अदालतीमध्ये ठेवण्यात आली होती. यामध्ये सर्वप्रथम पक्षकार व अधिवक्ता यांना महसूल अदालत संकल्पनेबाबत माहिती देण्यात आली. प्रस्तुत दावा परस्पर समजुतीने निकाली काढल्यास दोन्ही पक्षकारांना न्याय मिळवून त्यांचा वेळ व परिश्रम यांची कशी बचत होईल याबाबत समजावून सांगण्यात आले.

सर्व प्रकरणात सुनावणी घेतल्यानंतर एकूण २ प्रकरणात परस्पर संमतीने दावा निकाली काढण्याबाबत दोन्ही पक्षकारांनी मान्यता दिली. यापैकी मौजे दावडी, ता.कल्याण येथील एक दावा / वाद मागील १५ वर्षापासून प्रलंबित होता. या दाव्यांबाबत महसूल मंत्री महोदय यांच्या समक्ष सुनावणी सुरु होती. यावेळी महसूल मंत्री महोदय यांनी हे प्रकरण परस्पर समजुतीने सोडविण्याबाबत निर्देश दिले होते. या प्रकरणी उभय पक्षकार यांच्याशी चर्चाविनिमय करुन दोघांच्या संमतीने दाव्यामध्ये आपापसात समझोता मान्य करण्यात आला व मागील १५ वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून प्रलंबित असलेला वाद निकाली निघाला.

यापुढे दर तीन महिन्यांनी महसूल अदालतीचे आयोजन करुन जास्तीत जास्त दावे परस्पर समजुतीने निकाली काढण्याबाबत नियोजन करण्यात येणार आहे. या महसूल अदालतीच्या वेळी सबंधित दाव्याच्या अनुषंगाने अधिवक्ता व पक्षकार हजर होते. तसेच तहसिलदार कार्यालयातील निवासी नायब तहसिलदार, नायब तहसिलदार (महसूल) हजर होते. या कार्यक्रमातून शासनाचा सकारात्मक व लोकाभिमुख चेहरा लोकांसमोर मांडला जात आहे, असे कल्याण तहसिलदार सचिन शेजाळ यांनी सांगितले आहे.

# कपिलधारवाडीत जमीन खचली; तातडीने सर्वेक्षण करा

**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.०७, बीड :** बीड तालुक्यातील पाली ग्रामपंचायत हद्दीतील कपिलधारवाडी परिसरात निर्माण झालेल्या जमिनीतील भेगा व जमीन खचणे या गंभीर भूगर्भीय परिस्थितीवर तातडीने वैज्ञानिक भूगर्भ सर्वेक्षण करण्यात यावे, असे पत्र खा.बजरंग सोनवणे यांनी महानिदेशक, भारतीय भूगर्भ सर्वेक्षण , भारत सरकार, नवी दिल्ली यांना दिले आहे.

खा.बजरंग सोनवणे यांनी पत्रात म्हटले आहे, कपिलधारवाडी गाव व त्याच्या परिसरात (पाली ग्रामपंचायत) गेल्या काही दिवसांपासून अत्यंत गंभीर भूगर्भीय स्थिती निर्माण झालेली आहे, या गंभीर बाबीकडे तातडीने लक्ष देणे आवश्यक आहे. अलीकडच्या काही दिवसांत या परिसरात जमिनीत मोठ्या भेगा पडल्याचे दिसून आले असून त्या झपाट्याने वाढत आहेत. अनेक ठिकाणी जमीन खचल्याचेही स्पष्ट दिसते. त्यामुळे परिस्थिती अत्यंत गंभीर बनली असून स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतजमिनी, घरं, सार्वजनिक रस्ते इत्यादींना संभाव्य धोका निर्माण झाला आहे. या घडामोडींच्या स्वरूपावरून हे स्पष्ट होते की या भागात अनपेक्षित व धोकादायक भूगर्भीय बदल होत आहेत. या परिस्थितीच्या गांभीर्याचा तातडीने विचार करून भारतीय भूगर्भ सर्वेक्षण विभागान केंद्रातील तज्ज्ञांची टीम तातडीने पाठवून कपिलधारवाडी परिसर व आजूबाजूच्या भागाचा सखोल भूगर्भीय व



भू-तांत्रिक सर्वेक्षण करावे. या सर्वेक्षणाद्वारे भूस्खलन व भेगा पडण्यामागील शास्त्रीय कारणे शोधावीत व तात्काळ प्रतिबंधक व सुधारात्मक उपाय सुचवावेत. आवश्यक असल्यास पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय तसेच राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्याशी समन्वय साधून बाधित क्षेत्रातील सुरक्षिततेची खात्री करावी आणि पुढील मानवी व पर्यावरणीय हानी टाळावी.

या विषयाचे आपत्तीजन्य व तातडीचे स्वरूप लक्षात घेऊन या प्रकरणास प्राधान्य देऊन आपल्या प्रादेशिक तसेच केंद्रीय विभागांतून तातडीने कार्यवाही करावी, असेही खा.बजरंग सोनवणे यांनी म्हटले आहे. याच आशयाचे निवेदन राज्याचे मुख्यमंत्री श्री. देवेन्द्र फडनवीस व उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री श्री अजितदादा पवार यांना देऊन या गंभीर बाबीकडे राज्य शासनाचे लक्ष वेधले आहे.

# जिल्हा परिषद आदर्श शिक्षकांचा गुणगौरव समारंभ उत्साहात

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.०७, डहाणू (पालघर) :** जिल्हा परिषद पालघरच्या पंचायत समिती डहाणू शिक्षण विभागामार्फत आयोजित तालुकास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार व गुणगौरव समारंभ मंगळ वारी डहाणूतील अदानी औष्णिक वीज केंद्र प्रकल्पाच्या सभागृहात अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या समारंभात डहाणू तालुक्यातील विविध शाळांतील १५ आदर्श शिक्षकांचा शाल, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी दिलेले योगदान आणि शाळांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी घेतलेले प्रयत्न याबद्दल या शिक्षकांचा विशेष गौरव करण्यात आला. कार्यक्रमाची प्रस्तावना गट शिक्षणाधिकारी संजय वाघ यांनी केली. त्यांनी शिक्षण विभागाच्या कार्याचा आढावा घेत शिक्षकांचे अभिनंदन केले. प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित डहाणू विधानसभा क्षेत्राचे आमदार कॉ. विनोद निकोले यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले की, शिक्षक हे केवळ ज्ञानदाते नसून समाज परिवर्तनाचे प्रेरणास्थान आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आत्मविश्वास देऊन त्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळवून देणे हे शिक्षकांचे मोठे कार्य आहे.शिक्षक हे समाजाचे खरे शिल्पकार आहेत, असे प्रतिपादन आमदार कॉ. विनोद निकोले यांनी केले. शासनाच्या विविध शैक्षणिक योजनांचा लाभ प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत पोहोचविण्यात शिक्षकांची भूमिका अत्यंत मोलाची आहे. समारंभाला विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, विविध शिक्षक संघटनांचे पदाधिकारी, तसेच डहाणू तालुक्यातील शेकडो शिक्षक उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांच्या आणि शिक्षकांच्या विविध सांस्कृतिक सादरीकरणांनी कार्यक्रमाला अधिक रंगत आणली. कार्यक्रमाचे आयोजन आणि संयोजन पंचायत समिती डहाणू शिक्षण विभागाने केले होते. या कार्यक्रमातून शिक्षकांमध्ये एकात्मतेचा, शैक्षणिक निष्ठेचा आणि समाजसेवेच्या भावनेचा सुंदर संदेश देण्यात आला.

## थोडक्यात

### इंदू मिलमधील प्रस्तावित पुतळ्याच्या बुटाच्या भागाचे ठाण्यात जोरदार स्वागत


**अक्षराज : तानाजी ताकतोडे**



**दि.०६, कॅडबरी जॅक्शन (ठाणे) :** दादर येथील इंदू मिलमध्ये होऊ घातलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय स्मारकाचे काम युद्धपातळीवर सुरू झाले आहे. या ठिकाणी उभारण्यात येणाऱ्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या कामास सुरूवात झाली असून पुतळ्याच्या बुटाचा एक भाग दिनांक ०६ ऑक्टोबर २०२५ रोजी ठाण्यातून दादरच्या दिशेने नेण्यात आला. यावेळेस आंबेडकरी अनुयायांनी पुष्पवृष्टी करीत जोरदार स्वागत केले. कॅडबरी जंक्शन ते नितीन जॅक्शन ढोल ताशांच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली व मिठाई वाटप करण्यात आले. विशेष म्हणजे, या प्रसंगी बौद्ध बांधवांसह चर्मकार समाजही मोठ्या संख्येने उपस्थित होते.इंदू मिल येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारकात उभारण्यात येत आहे. छोटे छोटे पाठ मुंबईत आणून तो पुतळा उभारला जाणार आहे. या पुतळ्याच्या बुटाचा पुढील भाग आज ठाण्यातून मार्गक्रमण करणार असल्याची माहिती ठाण्यातील आंबेडकरी समुदायाला मिळताच भास्कर वाघमारे, राजाभाऊ चव्हाण, सुखदेव उबाळे, प्रमोद इंगळे, नंदकुमार मोरे, प्रल्हाद मगरे आदींच्या पुढाकारातून शेकडो आंबेडकरी बांधवांनी कॅडबरी सिग्नल येथे एकत्र येऊन स्वागत केले. याप्रसंगी डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच्या भागावर पुष्पवृष्टी करण्यात आली. तसेच, गाडीचा चालक आणि त्याचा सहकारी यांना कपडे आणि शाल देऊन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी भास्कर आरकडे, आबासाहेब चासकर, पंढरीनाथ गायकवाड, राजकुमार मालवी, सुभाष अहिरे, विमलताई शरणागत, विमल सातपुते, विनोद भालेराव, रवींद्र शिंदे यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

### सातारा जिल्हा क्रिकेट संघात पाटणच्या दोन खेळाडूंची निवड

**अक्षराज : सुरेश संकपाळ**



**दि.०७, पाटण (सातारा) :** महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशने आयोजित केलेल्या निमंत्रित लेदर क्रिकेट स्पर्धेसाठी १४ वयोगटाखालील सातारा जिल्हा संघातून पाटण येथील गौरेश मंगेश पाटणकर वय १२ व आदित्य सोमनाथ किरवे वय १३ या दोन खेळाडूंची निवड झाली आहे. या निवडीबद्दल गौरेश व आदित्य यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. पाटण येथील निकम स्पोर्ट्स क्लब चे अष्टपैलू खेळाडू गौरेश मंगेश पाटणकर वय १२ वर्षे (सलामीवीर फलंदाज / यष्टीरक्षक) आणि आदित्य सोमनाथ किरवे वय १३ वर्षे (डावखुरा वेगवान गोलंदाज) यांनी निवड प्रक्रिये दरम्यान केलेल्या जोरदार कामगिरीच्या जोरावर महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशने आयोजित निमंत्रित लेदर क्रिकेट स्पर्धे साठी सातारा जिल्हा १४ वर्षा खालील क्रिकेट संघात निवड झाली आहे. या दोन्ही खेळाडूंना कोच शिरीष देशमुख, आकाश गुजर यांचे मार्गदर्शन लाभले. या दोन्ही खेळाडूंचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

### पोपटराव खेडेकर यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन सुप्रिया सुळे यांच्या हस्ते

**अक्षराज : स्वामी दळवी**




**दि.०७, खडकवासला (पुणे) :** पुणे येथील नऱ्हेगाव या ठिकाणी भैरवनाथ मंदिराच्या शेजारी मेन चौकामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे नऱ्हेगावचे आदर्श सरपंच पोपटराव खेडेकर यांनी भव्य दिव्य असं राष्ट्रवादी काँग्रेसचे जनसंपर्क कार्यालय उभा केले असून या कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी खासदार सुप्रिया सुळे बोलत होत्या. पुढे बोलताना सुप्रिया सुळे यांनी सध्याच्या राजकीय परिस्थितीवरती आणि पुणे शहराचा ट्रॅफिकचा विषय, प्रदूषणाचा विषय, कचरा या विविध विषयांवर सत्ताधाऱ्यांना सुनावले. या प्रसंगी माजी महापौर प्रशांत जगताप यांना ही विविध विषयांवर मत मांडले. प्रास्ताविक पोपटराव खेडेकर यांनी केले. या प्रसंगी पुणे शहर राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडीच्या प्रमुख स्वातीताई पोकळे खडकवासला महिला आघाडी प्रमुख राजश्री पाटील, माजी सभापती प्रभावती भुमकर, सुप्रिया भुमकर व इतर मान्यवर मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

### दिव्यातील सामाजिक संघटना व पत्रकार संघाकडून पूरग्रस्तांना मदतीचा हात

**अक्षराज : विनोद वास्कर**



**दि.०७, ठाणे :** महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ ठाणे शहर (जिल्हा) व दिवा शहरातील अनेक सामाजिक संघटनांनी राज्यात झालेल्या अतिवृष्टीचा फटका पडलेल्या पूरग्रस्तांना मदतीचा हात दिला आहे. पूरग्रस्त शेतकऱ्यांना शालेय व जीवनाश्यक वस्तूंचे वाटप करण्यासाठी दिवा शहरातून ट्रकभर सामान पाठविण्यात आले. मराठावड्यात जिल्हा धाराशिव, तालुका परंडा गाव, वागेगाव्हाण, साकत बुद्रुक. या गावाना शालेय साहित्य, धान्य किट व जीवनाश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले.

शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन जगाच्या पोशिंदाची व्यथा जाणवून घेतली. प्रसंगी शेतकऱ्यांच्या व्यथा ऐकून सर्वांच्या डोळ्यात अश्रुंचा बांध फुटला. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ ठाणे शहर जिल्ह्याच्या वतीने संघाचे राज्य संघटक संजय भोकरे, सरचिटणीस डॉ.विश्वासरावं आरोटे यांच्या मार्गदर्शनाखाली आज मराठवाड्यातील जिल्हा धाराशिव परंडा येथील दुष्काळ ग्रस्त भागातील शेतकऱ्यांसाठी जीवनावश्यक वस्तूचे वाटप करण्यात आले यावेळी दिवा शहरातून जीवनावश्यक वस्तूचा ट्रक पाठवण्यात आले. प्रसंगी ठाणे जिल्हाद्यक्ष सतीश कुमार भावे यांच्या उपस्थित सचिव संतोष पडवळ, डिजिटल मीडियाचे अद्यक्ष अमित जाधव, कार्याद्यक्ष अतुल भारतीय, सल्लागार बिनु वर्गिस यांच सहकार्य लाभले.